Kamdhenu SevabhaviSanstha s Est. Year - 2000

**VASUNDHARA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE,GHATNANDUR**

NAAC Accredited B Grade, With CGPA 2.47

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Dr.Arun Dalve
(M.A.,B.Ed.,Ph.D.)
Principal

Mob.9822898727
Mob. 9421342148
Mob. 9923019540
Website: www.vasundharacollege.org.in
E-mail - principalvcg@rediffmail.com

Ghatnandur, Tq.Ambajogai, Dist.Beed,Pin431519(Maharashtra)mailvasundharacollege2000@gmail.com

# Marathi Wikipedia Workshop

**Report 2018-19**

It is with great pleasure to present the report of Marathi Wikipedia State Level Workshop that in the academic year 2018-19, State Marathi Development Institute, Mumbai and Vasundhara College, Ghatnandur jointly organized Marathi Wikipedia State Level Workshop.This workshop was organized on $07^{th}$,January,2016.

The workshop was inaugurated at exactly 11.00 am. The function was presided over by the principal of the college Dr. Arun Dalve . Chief Guest was Hon. Vikas Kamble (Assistant and Coordinator State Marathi Development Institute, Mumbai Maharashtra State) . The format of this workshop was to introduce Wikipedia, to increase the knowledge of computer technology among the students, and also to inform about the nature and features of Wikipedia as an open knowledge base. A total of 84 students and professors participated in this day-long workshop.

For this workshop Principal Dr.Arun Dalve, Hon. Prof. Vikas Kamble, Pro. Godbole, Mr. Pappu Shete guided to Student and professors. The faculty and non-teaching staff worked hard to make this competition a success. Coordination and introduction of this program was given by Prof. Dr. Sanjay Khadap, Prof. Narsingh Udar thanked all of them.

Prof. Dr. Sanjay Khadap
(Department of Marathi )

Principal

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

महाराष्ट्र शासन
# राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ :- www.rmvs.maharashtra.gov.in इ-टपाल : rmvsmumbai@gmail.com; rmvs_mumbai@yahoo.com

नस्ती क्र. रामविसं/विकि/ प्र.क्र. ११७/४०४६/प्रकल्प-२/२०१६
दिनांक : ०२/१२/ २०१९

प्रति,
मा. प्राचार्य,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

**विषय:- मराठी विकिपीडियाविषयक जागृती करणाऱ्या कार्यशाळेबाबत**

महोदय,

राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा २०२० (१ ते १५ जानेवारी, २०२०) ह्या कालावधीत मराठी विकिपीडियाविषयक जागृतीसाठी महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरांवरील विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांच्यासाठी कार्यशाळा घेण्यात येणार आहेत.

कार्यशाळेचे स्वरूप 'विकिपीडियाची तोंडओळख करून देणारी कार्यशाळा' असे असेल. कार्यशाळेचे माध्यम मराठी असेल व कार्यशाळेत कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्याला सहभागी होता येईल. सदर कार्यशाळेत ज्ञानकोशीय नोंदींचे स्वरूप थोडक्यात समजावून सांगण्यात येईल तसेच विकिपीडियाचे मुक्त ज्ञानकोश म्हणून स्वरूप व वैशिष्ट्य ह्यांची माहिती देऊन त्यात नोंदी करण्यासंदर्भातील प्रात्यक्षिक दाखवण्यात येईल.

ह्या कार्यशाळांपैकी एक कार्यशाळा आपल्या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने घेता येईल का ह्याबाबत आपला अभिप्राय आपण संस्थेला लवकरात लवकर कळवावा. कार्यशाळेसाठी आपले पुढील तऱ्हेचे साहाय्य अपेक्षित आहे.

१. संगणक व महाजाल वापरता येण्याची सोय असलेली संगणक-प्रयोगशाळा उपलब्ध करून देणे.
२. प्रत्येकी २ विद्यार्थ्यांना मिळून किमान १ संगणक उपलब्ध असणे अनिवार्य आहे.
३. संगणकांवर युनिकोड आधारित टंकलेखन करण्यासाठीची यंत्रणा कार्यरत असावी.
४. कार्यशाळेच्या वेळी संगणक आणि महाजाल यांची व्यवस्था पाहण्यासाठी एक जाणकार व्यक्ती आयोजक संस्थेने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
५. संगणक-प्रयोगशाळेचा सार्वजनिक दृश्य अंकपत्ता रेंज (Publicly Visible IP address range) माहीत करून हवा आहे. त्यायोगे ज्या सहभागी अभ्यासकांची विकिपीडियावर आधीपासून सदस्यखाती नसतील त्या सर्वांची सदस्यखाती कार्यशाळेदरम्यान एकाच वेळी विनाअडथळा उघडणे सुकर होईल. संगणक प्रयोगशाळेचा खासगी/अंतर्गत अंकपत्ता (Private IP address) देऊ नये.
६. आपल्या संस्थेतील तसेच परिसरातील विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांच्यापर्यंत कार्यशाळेची माहिती पोहचवण्यासाठी भित्तिपत्रके इ. माध्यमातून प्रसिद्धीची व्यवस्था करण्यात यावी.
७. कार्यशाळेतील सहभागी तसेच मार्गदर्शक ह्यांच्या चहापानाची सोय करण्यात यावी.
८. ह्या कार्यशाळेदरम्यान राज्य मराठी विकास संस्था आणि आयोजक संस्था यांच्यात समन्वय साधण्यासाठी आपण एका व्यक्तीची समन्वयक म्हणून नियुक्ती करावी व तिचे नाव संस्थेला कळवावे. सदर उपक्रम पार पाडण्यासाठी आपल्याकडील सर्व व्यवस्था करण्याचे दायित्व व त्यासाठीचे आवश्यक ते अधिकार ह्या व्यक्तीकडे असावेत. सदर व्यक्तीला राज्य मराठी विकास संस्थेकडून स्वतंत्रपणे रु. १०००/- इतके मानधन देण्यात येईल.
९. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना देण्यात येण्याच्या प्रमाणपत्राचे प्रारूप राज्य मराठी विकास संस्थेद्वारे तयार करून देण्यात येईल त्या प्रारूपानुसार प्रमाणपत्रांचे मुद्रण करून ती प्रमाणपत्रे वितरित करण्यात यावी. आयोजक

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

८०-५१.२०१५४
०६/१२/१९

- संस्थेने कार्यशाळा निश्चितीनंतर लगेचच आपली मुद्रा (लोगो), प्रमाणपत्रावर स्वाक्षरी [illegible]ची स्वाक्षरी [illegible] सामग्री राज्य मराठी विकास संस्थेला पुरवावी.

१०. सहभागी आयोजक संस्थेला चहापान, कार्यशाळा-प्रसिद्धीसाठी, सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे छपाईसाठी अशी एकूण रु. ४,०००/- इतकी रक्कम राज्य मराठी विकास संस्थेद्वारे देण्यात येईल.

११. ह्या कार्यशाळेसाठी समन्वयकाचे नाव, त्यांचे खातेक्रमांक आय. एफ. एस. सी. कोड, बँकेचे नाव व शाखा इत्यादी तपशील राज्य मराठी विकास संस्थेला कळवावे.

कार्यशाळा घेणाऱ्या व्यक्तींशी समन्वय, त्यांचे मानधन, प्रवासखर्च ह्यांची व्यवस्था राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने पाहण्यात येईल.

सदर कार्यशाळेतील सहभागाबाबत आपण संस्थेला शक्य तितक्या लवकर कळवावे व शक्य असल्यास ०१ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२० ह्या कालावधीत कोणत्या दिनांकास कार्यशाळा घेता येईल हेही कळवावे, ही विनंती.

आपला,

(डॉ. आनन्द काटीकर)
प्र. संचालक

**PRINCIPAL**
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519